# वारस प्रकरण धोरण

## सन २०२६–२७

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशील | पान क्रमांक |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | ३ |
| २ | मयताच्या ठेव / लॉकर खात्यांस अनुसरून, वारस प्रकरणा बाबतची कार्यपद्धती– | ३ |
| | २.१ वारस प्रकरण सादर करावयाची कार्यपद्धती | ३ |
| | २.२ वारस प्रकरणाचा निपटारा करण्यासाठीची कालमर्यादा (Time Limit) | ४ |
| | २.३ वारस प्रकरणाचा निपटारा करण्यामध्ये विलंब झाल्यास द्यावयाची नुकसान भरपाई | ४ |
| ३ | जोखीम मर्यादा व ठेव खात्यास नामनिर्देशन नसल्यास/ Surviorship स्वरुपाच्या ठेव खात्यामधील देय रक्कमेसंदर्भात करावयाची कार्यवाही | ५ |
| | ३.१ जोखीम मर्यादेपेक्षा जास्तीच्या देय रक्कमेसंदर्भात करावयाची कार्यवाही | ५ |
| | ३.२ जोखीम मर्यादेपर्यतच्या देय रक्कमेसंदर्भात करावयाची कार्यवाही | ६ |
| ४ | प्राथमिक बाबी व अनिवार्य कागदपत्रे | ७ |
| ५ | मृत्यूपत्रान्वये देय असलेल्या ठेव रक्कमेबाबत | ९ |
| | ५.१ मृत्यूपत्रान्वये देय असलेल्या ठेव रक्कमेबाबत वाद असल्यास | १० |
| ६ | महत्वपूर्ण बाबी | १० |
| ७ | मयताच्या नावे असलेल्या ठेव खात्यास नामनिर्देशन असल्यास/ ठेव खाते Surviorship स्वरुपाचे असल्यास देय रक्कमेसंदर्भात करावयाची कार्यवाही | ११ |
| ८ | नामनिर्देशनाबाबत महत्वाचे | १२ |
| ९ | हिंदू अविभक्त कुटुंब यांची खाती | १४ |
| १० | संयुक्त आणि Surviorship स्वरुपाच्या खात्यांच्या बाबतीत | १५ |
| ११ | परागंदा ठेवीदारांच्या देय ठेव रक्कमे बाबत | १५ |
| १२ | ठेवीदारच्या मृत्यूपश्चात मुदत ठेव मुदतपूर्व मोडणेबाबत | १६ |
| १३ | मयताच्या नावच्या ठेव रक्कमेचा निपटारा केलेनंतर (After Settelment of Claim) मयताच्या नावे खात्यामध्ये रक्कम जमा झालंनतर करावयाची कार्यवाही | १६ |
| १४ | लॉकर बाबत | १७ |
| | १४.१ लॉकर खात्यास नामनिर्देशन (Nomination) असल्यास | १७ |


अर्बन को-ऑप. बँक लि. कराड. नो. क्र. -१३०९ दि.२४/११/१९१७ कोड नं. ०

| | | |
|---|---|---|
| | १४.२ लॉकर खात्यास नामनिर्देशन (Nomination) नसल्यास/ Surviorship स्वरुपाचे नसल्यास | १८ |
| | १४.३ लॉकर खात्याबाबत मृत्यूपत्र अस्तित्वात असल्यास करावयाची कार्यवाही | १९ |
| १५ | वारस प्रकरण कार्यवाही अहवाल ( Control Return ) | २१ |
| १६ | पदनिहाय मंजुरीचे अधिकार | २१ |
| | १६.१ वारस प्रकरण मंजुरीचे अधिकार | २१ |
| १७ | मयत सभासद भाग रक्कमेचा (शेअर्स रक्कमेचा) जमाखर्च | २२ |
| १८ | व्याज आकारणी | २३ |
| १९ | वारसप्रकरणी घ्यावयाच्या कागदपत्रांचे नमुने – | – |

## १. प्रस्तावना

बँकिंग व्यवसायामध्ये ठेव आणि कर्ज व्यवहारास अनन्य साधारण महत्त्व आहे. विशेषत्वाने ठेव संकलनाबाबत विशिष्ट उद्देश, ध्येय आणि नियोजनाची गरज असते. बँकेच्या ठेवीमधील प्रमुख घटक म्हणजे वैयक्तिक ठेवी, सेव्हिंग्ज खाती, चालू खाती होय. बँकेकडील असणाऱ्या ठेव खात्यांना नामनिर्देशनाची सोय उपलब्ध आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या परिपत्रकीय सूचनांनुसार, एक किंवा अधिक व्यक्तींचे नामनिर्देश केले जाऊ शकते. याबाबत ठेव धोरणातील तरतुदी लागू राहतील. नानिर्देशन करणे ऐच्छिक असल्यामुळे काही खातेदार त्यांच्या ठेव खात्यांना नामनिर्देशन करीत नाहीत. परिणामी खातेदाराच्या मृत्यूनंतर वारसांना रक्कम अदा करताना बऱ्याच अडचणींना सामोरे जावे लागते. याबाबत शाखापातळीवर खातेदारांना नामनिर्देशन सुविधेबाबत जागृत करणे आवश्यक आहे.

मयत ठेवीदारांच्या वारसांना किंवा नामनिर्देशित व्यक्तींना, त्याचप्रमाणे Surviorship स्वरुपाच्या खात्यांसाठी Survior म्हणजेच हयात खातेदारास रक्कम अदा करताना त्यामध्ये सुसूत्रता आणणे, रक्कम देण्याबाबतचे अधिकार कार्यालयीन पातळीवर प्रदान करणे, कामकाजाची नियमावली निश्चित करणे इत्यादी बाबी ग्राहकांना तत्पर सेवा देण्यासाठी आवश्यक आहेत. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांची वारस प्रकरणा संबंधि सूचना, कायद्यातील नियमांचा व्यावहारिक अवलंब करण्याच्या दृष्टीने तसेच वारस प्रकरणे हाताळताना येणाऱ्या अडचणींवर मात करून उत्तम ग्राहक सेवा देण्यासाठी सदर धोरणाची निर्मिती करण्यात आली होती. त्यामध्ये अनुभवाच्या आधारे कार्यपद्धतीमधील अडचणींवर मात करण्यासाठी तसेच नियमांची अंमलबजावणी परिणामकारक होण्यासाठी तसेच ग्राहक सेवा अचूक व तत्परतेने देण्यासाठी काही बदल करण्यात आलेले आहेत.

बँकेकडे प्राप्त होणाऱ्या वारस प्रकरणांचा विचार करता वैयक्तिक, संयुक्त खाती, विशेष सूचना असलेल्या खात्याबाबत तसेच बेपत्ता व्यक्तीच्या खात्याच्या बाबतीत कोणती कार्यवाही करावी याचा तपशीलवार आढावा या धोरणामध्ये घेण्यात आला आहे.

## २. मयताच्या ठेव / लॉकर खात्यांस अनुसरून, वारस प्रकरणा बाबतची कार्यपद्धती–

### २.१. वारस प्रकरण सादर करावयाची कार्यपद्धती –

- बँकेने वारस प्रकरणा बाबत Standardized / Uniformity (एकसमान / प्रमाणित स्वरूपाचे) असलेले अर्ज / फॉर्म चा वापर करणेचा असून, वारस प्रकरणास अनुसरून स्विकारण्यात येणारी कागदपत्र ही आर.बी.आय यांनी त्यांचे निर्देशक सुचणे मध्ये सुचविलेप्रमाणे Annex I-A ते Annex I-H या विहित नमुन्यामध्ये असावीत.
- मयताच्या ठेव / लॉकर खात्याच्या बाबतीत वारस प्रकरणाचा निपटारा करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे व फॉर्म हे बँकेच्या सर्व शाखा तसेच बँकेच्या वेबसाईटवर उपलब्ध ठेवण्यात आलेले आहेत. त्याचसोबत वारस प्रकरणा बाबत Claimant ( दावेदार / लाभार्थी ) यांनी करावयाची कार्यवाही व त्यासाठी आवश्यक कागदपत्रांची यादी बँकेद्वारे बँकेच्या वेबसाईटवर **प्रकाशित केलेले आहेत.**
- Claimant ( दावेदार / लाभार्थी ) यास बँकेच्या कोणत्याही शाखेत वारस प्रकरण सादर करण्याचे स्वातंत्र्य राहील व त्याबाबतची पोहोच शाखेस द्यावी लागेल. Claimant ( दावेदार / लाभार्थी ) याने वारस प्रकरणास अनुसरून आवश्यक सर्व कागदपत्रांची पूर्तता केली असल्यास, त्याबाबतची निश्चिती (Confirmation) बँकेद्वारे सदर वारस प्रकरणाची पोहोच Claimant ( दावेदार / लाभार्थी ) यास देताना दिली जाईल.

किंबहुना, Claimant ( दावेदार / लाभार्थी ) याने वारस प्रकरण सादर करताना द्यावयाच्या कागदपत्रांमध्ये काही अपूर्णता असल्यास / काही कागदपत्रे चुकीची असल्यास आवश्यक कागदपत्रे जमा करणे बाबत Claimant ( दावेदार / लाभार्थी ) यास वारस प्रकरणाची पोहोच देताना करावयाच्या पूर्तते बाबत लेखी सूचित करावे व जेव्हा त्यांचे द्वारे वारस प्रकरणाबाबत आवश्यक सर्व कागदपत्रे देण्यात येतील तेव्हाच त्यांना वारस प्रकरणाच्या अनुषंगाने सर्व कागदपत्रांची पूर्तता केली असल्या बाबत निश्चिती(Confirmation) द्यावी.

- बँकेद्वारे Online पद्धतीने वारस प्रकरण सादर करण्याची सुविधा उपलब्ध **करून दिलेली आहे**. जेव्हा Claimant ( दावेदार / लाभार्थी ) याने Online पद्धतीने आवश्यक कागदपत्रासह वारस प्रकरण सादर केले जाईल तेव्हा त्यास योग्य माध्यमातून त्याबाबतची पोहोच मिळेल अशी **उपाययोजना बँकेने केलेली आहे**.

२.२ **वारस प्रकरणाचा निपटारा करण्यासाठीची कालमर्यादा (Time Limit)** –

२.२.१ **मयताचे ठेव खात्यांस** अनुसरून, Claimant ( दावेदार / लाभार्थी ) याने वारस प्रकरणास अनुसरुन आवश्यक सर्व कागदपत्र (प्रस्तुत धोरणामध्ये नमूद प्रमाणे) बँकेकडे सादर केले दिवसापासून अथवा Claimant (दावेदार / लाभार्थी ) याने वारस प्रकरण सादर करतानाच सर्व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली असल्यास असे प्रकरण बँकेस प्राप्त झाले दिवसापासून १५ दिवसांचे आत सदर वारस प्रकरणाचा निपटारा करणे बँकेस क्रमप्राप्त राहील.

२.२.२ **मयताचे लॉकरखात्यास** अनुसरून, Claimant ( दावेदार / लाभार्थी ) याने आवश्यक सर्व कागदपत्र बँकेकडे सादर केले दिवसापासून १५ दिवसांचे आत, सदर लॉकरखात्यामधील मुद्देमाल / जिन्नस / वस्तू काढणे संबंधी निश्चित केलेली तारीख, वेळ याबाबत Claimant ( दावेदार / लाभार्थी ) यास अवगत करून, नेमले दिवशी सदर कार्यवाही पार पाडून प्रकरणाचा निपटारा करणेचा आहे.

टीप– १५ दिवसांचा कालावधी हा Claimant ( दावेदार / लाभार्थी ) याने वारस प्रकरण संबंधित आवश्यक ती सर्व कागदपत्रे बँकेकडे दाखल केल्यानंतर व त्याबाबत बँकेने त्यांना पोहोच दिल्यानंतर सुरु होईल. Claimant ( दावेदार / लाभार्थी ) यांनी द्यावयाच्या कागदपत्रामध्ये कोणतीही अपूर्णता ठेवली व प्रकरण सादर केले तर त्यावेळी १५ दिवसांचा कालावधी जोपर्यंत अपूर्ण कागदपत्रांची पूर्तता केली जात नाही तोपर्यंत ग्राह्य धरला जाणार नाही

२.३ **वारस प्रकरणाचा निपटारा करण्यामध्ये विलंब झाल्यास द्यावयाची नुकसान भरपाई –**

**मयताचे ठेव खात्यास** अनुसरून बँकेने वर २.२.१ मध्ये नमूद प्रमाणे निर्धारित वेळेत वारस प्रकरणाचा निपटारा न केल्यास, झालेल्या विलंबा बाबतचे कारण बँकेने Claimant ( दावेदार / लाभार्थी ) यांना कळविणे गरजेचे असून, असा विलंब बँकेमुळेच झाला असल्यास, अशा प्रकरणी बँकेने व्याजाच्या स्वरुपात नुकसान भरपाई देणे क्रमप्राप्त आहे. नुकसान भरपाईच्या व्याजाची आकारणी ही वारस प्रकरणा अंतर्गत देय रक्कमेस अनुसरून, झालेल्या दिवसांचा विलंब व त्यावरती बँकेचा प्रचलित / चालू व्याज दर + ४% द.सा.द.शे व्याज दराने आकारणी करून येणारी रक्कम अशा स्वरुपात असेल. अशा प्रकारच्या देय रक्कमेस अनुसरून, बँकेच्या चालू / प्रचलित व्याज दराबाबतची तारीख विचारात घेताना, सदर वारस प्रकरणास अनुसरून Claimant ( दावेदार / लाभार्थी ) याने सर्व आवश्यक कागदपत्रांची बँकेकडे पूर्तता केलेची तारीख विचारात घेतली जाईल.

को-ऑप. बँक लि. कराड. नो.क्र.–१३०९ दि.२४/१/१९९७ कोड नं. ०

**मयताचे लॉकरखात्यास** अनुसरून, बँकेने वर अ.क्र. २.२.३ मध्ये नमूद प्रमाणे निर्धारित वेळेत वारस प्रकरणाचा निपटारा न केल्यास, विलंब झालेल्या प्रत्येक दिवसास रक्कम रु. ५०००/- प्रमाणे नुकसान भरपाई द्यावी लागेल.

## ३. जोखीम मर्यादा व ठेव खात्यास नामनिर्देशन नसल्यास /Surviorship स्वरुपाच्या ठेव खात्यामधील देय रक्कमेसंदर्भात करावयाची कार्यवाही-

Surviorship स्वरुपाच्या नसलेल्या आणि ज्या ठेवींना नामनिर्देशन केलेले नाही अशा प्रकारच्या खात्यांमधील देय रक्कमा छोट्या आहेत, त्यांना कोर्टकचेरी न करता किंवा सक्सेशन सर्टिफिकेट न आणता सुलभतेने अशा रक्कमा वारसांना मिळाव्यात यासाठी ही जोखीम मर्यादा निश्चित केली जाते. यादृष्टीने मुद्दल व व्याजासह होणारी रक्कम विचारात घेऊन रक्कम रु.१० लाख रूपयांपेक्षा कमी रक्कमेच्या, ज्या ठेवी असतील त्यात कोर्ट कचेरी किंवा सक्सेशन सर्टिफिकेटशिवाय कायदेशीररित्या आवश्यक कागदपत्रांच्या पूर्ततेनंतर बँक आपल्या जोखमीवर रक्कम वारसांना अदा करेल.

मयत ठेवीदाराची रक्कम त्याच्या कायदेशीर वारसाव्यतिरिक्त अन्य कोणास अदा झाली; तर बँकेला तोषिस लागू शकते आणि पर्यायाने सेवकांवरदेखील उत्तरदायित्त्व धोरणानुसार कारवाई केली जाऊ शकते. अशाप्रकारची जोखीम नियंत्रित राहावी यादृष्टीने जोखीम मर्यादा निश्चित केलेली आहे.

### ३.१ जोखीम मर्यादेपेक्षा जास्तीच्या देय रक्कमेसंदर्भात करावयाची कार्यवाही–

वर नमूद केलेल्या जोखीम मर्यादेपेक्षा अधिक रक्कमेच्या बाबतीत शाखाधिकाऱ्यांनी संबंधितांचे कडून सक्षम न्यायालयाचा वारसा दाखला मागवून त्यानंतर पुढील प्रमाणे कार्यवाही करावी:-

मयत व्यक्तीच्या नावची रक्कम मागणी करणारी व्यक्ती म्हणजेच दावेदार / हक्कदार / क्लेमंट ( Claimant ) याचे कडून खालील कागदपत्र घ्यावीत.

१) मयताचा मृत्यचा दाखला घ्यावा.
२) Annex I-B प्रमाणेचा विहित नमुन्यातील क्लेम फॉर्म आवश्यक माहितीसह सविस्तर भरून घ्यावा. ( सदर क्लेम फॉर्म मधील गैरलागू मजकूर खोडावा.)
३) रक्कम मागणी करणाऱ्या व्यक्तीचे म्हणजेच दावेदार / हक्कदार / क्लेमंट ( Claimant ) याचे कोणतेही एक Officially Valid Document (OVD) घ्यावे. ज्यामध्ये पासपोर्ट, ड्रायव्हिंग लायसेन्स, निवडणूक आयोगाने जारी केलेले मतदान ओळखपत्र, NREGA यांनी जारी केलेले जॉब कार्ड ज्यावरती राज्य शासनाच्या अधिकाऱ्याची सही असेल, Unique Identification Authority of India यांनी जारी केलेले आधार कार्ड इ. चा समावेश असेल.
४) वारसा दाखला देण्याचे अधिकार कोर्टाला असल्याने सक्षम कोर्टाने दिलेला वारसा दाखला

**किंवा**

मयताचे कुटुंब व मयताचे वारस सुपरिचित असणाऱ्या व्यक्तीचे (सदर व्यक्ती Claimant नसावा) विहित नमुन्यातील म्हणजेच Annex I-E प्रमाणे मयताच्या वारसाबाबतचे मे.न्यायालयासमोरील किंवा मे. नोटरी पब्लिकसो यांचे समोरील प्रतिज्ञापत्र बँक दप्तरी घ्यावे. मात्र अशाप्रकारे प्रतिज्ञापत्र करून देणारी व्यक्ती बँकेस मान्य असली पाहिजे आणि अशी व्यक्ती सदर क्लेममध्ये हिस्सेदार किंवा लाभार्थी नसावी. अशा प्रकरणामध्ये बँकेने, रक्कम मागणी करणाऱ्या व्यक्तीच्या (Claimant) सहीचे विहित नमुन्यातील म्हणजेच Annex I-C प्रमाणेचे हमीपत्र घ्यावे. त्याचसोबत रक्कम मागणी करणाऱ्या व्यक्ती (Claimant) व्यतिरिक्त मयताचे इतर



अर्बन को-ऑप. बँक लि. कराड. नों. क्र. 1१३०९ दि.२४/१/१९१७

वारस असल्यास, त्यांचेकडून देय रक्कमेसंदर्भात विहित नमुन्यातील म्हणजेच Annex I-D प्रमाणे Letter of disclaimer म्हणजेच अस्विकरण पत्र किंवा नाहरकत दाखला (Claimant यास सदर रक्कम देण्यास कोणतीही हरकत नसलेबाबत) घ्यावा. याव्यतिरिक्त अशा प्रकरणामध्ये बँक तिऱ्हाईत व्यक्ती ( ज्यामध्ये रक्कम मागणी न करणाऱ्या वारसांचा समावेश असला पाहिजे) यांचेकडून विहित नमुन्यातील म्हणजेच Annex I-C प्रमाणेचे हमीपत्र घेऊन रक्कम वारसांना अदा करू शकते. याप्रमाणे पूर्तता करून देय रक्कमेचा परतावा केल्यास बँकेस कायदेशीर दायित्वातून मुक्तता मिळते.

मयताच्या वारसास देय असणारी रक्कम रु.१० लाखांपेक्षा अधिक असल्यास संबंधित वारसांकडून सक्षम न्यायालयाचा सक्सेशन सर्टिफिकेट प्राप्त करून घेतल्यानंतरच, सक्सेशन सर्टिफिकेटमध्ये मे.न्यायालयाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे संबंधित वारसास रक्कम अदा करावी. त्यात कोणताही फेरफार करू नये. मयत खातेदाराच्या वारसांचे बँकेकडे आर्थिक व्यवहार असल्यास व वारसाहक्काने मिळणारी सर्व रक्कम बँकेच्या मुदत ठेव योजनेत गुंतवली जात असल्यास, अपवादात्मक परिस्थितीत सक्सेशन सर्टिफिकेटचा आग्रह न धरता रु.२० लाखापर्यंतची वारस प्रकरणे संबंधित साहाय्यक महाव्यवस्थापक, उपमहाव्यवस्थापक किंवा शाखा नियंत्रक एक्झिक्युटिव्ह अधिकारात मंजूर करण्यात येतील. मात्र अशाप्रकारची होणारी मुदत ठेवीतील गुंतवणूक **किमान पाच वर्षे किंवा अधिक काळासाठी** बँकेकडे व्याजासह राहणे आवश्यक राहील. तसेच सदर मुदत ठेवीवर कोणत्याही प्रकारचे कर्ज देता येणार नाही वा सदर मुदत ठेव कोणत्याही प्रकारे तारण घेता येणार नाही. अशाप्रकारे मंजूर करण्यात येणाऱ्या प्रकरणामध्ये ही प्रमुख अट राहील. नव्याने होणाऱ्या मुदत ठेव पावत्यांवर दर्शनी भागावर तशा आशयाचा शिक्का उमटवून त्याखाली प्रकरण मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यांची स्वाक्षरी असणे गरजेचे राहील. मात्र दरम्यानच्या काळात सक्सेशन सर्टिफिकेट हजर केल्यास सदरची अट आपोआप शिथिल होईल आणि सक्सेशन सर्टिफिकेटमध्ये नमूद केल्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

### ३.२ जोखीम मर्यादेपर्यंतच्या देय रक्कमेसंदर्भात करावयाची कार्यवाही–

ज्या ठेव खात्यास नामनिर्देशन नाही किंवा जी Survivorship स्वरूपाची नाहीत. अशा खात्यांच्या बाबतीत देय रक्कम (व्याजासह) ही बँकेने निश्चित केलेल्या जोखीम मर्यादे (Threshold Limit) पेक्षा कमी असल्यास, प्रथम खालील गोष्टींची खातरजमा करावी –

१) मयत ठेवीदाराने, ठेवीस नामनिर्देशन केले नाही व ठेव खाते Survivorship स्वरूपाचे नाही.
२)मयताने कोणतेही मृत्यपत्र केलेले नाही.
३)मयताचा इतर कोणताही claim नाही

वर नमूद प्रमाणे बाबींची खातरजमा केले नंतर बँकेने रक्कम मागणी करणाऱ्या व्यक्ती म्हणजेच दावेदार / हक्कदार / क्लेमंट ( Claimant ) कडून खालील कागदपत्र घ्यावीत.

१) Annex I-B प्रमाणेचा विहित नमुन्यातील क्लेम फॉर्म आवश्यक माहितीसह सविस्तर भरून घ्यावा. ( सदर क्लेम फॉर्म मधील गैरलागू मजकूर खोडावा)
२) मयताचा मृत्यचा दाखला घ्यावा.
३) रक्कम मागणी करणाऱ्या व्यक्तीचे म्हणजेच दावेदार / हक्कदार / क्लेमंट ( Claimant ) याचे कोणतेही एक Officially Valid Document (OVD) घ्यावे. ज्यामध्ये पासपोर्ट, ड्रायव्हिंग लायसेन्स, निवडणूक आयोगाने जारी केलेले मतदान ओळखपत्र, NREGA यांनी जारी केलेले

नो. क्र. १३०९ दि.२४/१/१९१७ कोड नं. ०

जॉब कार्ड ज्यावरती राज्य शासनाच्या अधिकाऱ्याची सही असेल, Unique Identification Authority of India यांनी जारी केलेले आधार कार्ड ई. चा समावेश असेल.

४) रक्कम मागणी करणाऱ्या व्यक्तीच्या (Claimant) याच्या सहीचे Annex I-C प्रमाणेचे विहित नमुन्यातील हमीपत्र घ्यावे.

५) रक्कम मागणी करणाऱ्या व्यक्ती (Claimant) व्यतिरिक्त मयताचे इतर वारस असल्यास, त्यांचेकडून देय रक्कमेसंदर्भात Annex I-D प्रमाणेचे विहित नमुन्यातील Letter of disclaimer म्हणजेच अस्विकरण पत्र किंवा नाहरकत दाखला (Claimant यास सदर रक्कम देण्यास कोणतीही हरकत नसलेबाबत) घ्यावा.

६) वारसा दाखला देण्याचे अधिकार कोर्टाला असल्याने सक्षम कोर्टाने दिलेला वारसा दाखला

**किंवा**

मयताचे कुटुंब व मयताचे वारस सुपरिचित असणाऱ्या व्यक्तीचे (सदर व्यक्ती Claimant नसावा) विहित नमुन्यातील म्हणजेच Annex I-E प्रमाणे मयताच्या वारसाबाबतचे मे.न्यायालयासमोरील किंवा मे. नोटरी पब्लिकसो यांचे समोरील प्रतिज्ञापत्र बँक दप्तरी घ्यावे. मात्र अशाप्रकारे प्रतिज्ञापत्र करून देणारी व्यक्ती बँकेस मान्य असली पाहिजे आणि अशी व्यक्ती सदर क्लेममध्ये हिस्सेदार किंवा लाभार्थी नसावी. अशा प्रकरणामध्ये बँकेने, रक्कम मागणी करणाऱ्या व्यक्तीच्या (Claimant) सहीचे विहित नमुन्यातील म्हणजेच Annex I-C प्रमाणेचे हमीपत्र घ्यावे. त्याचसोबत रक्कम मागणी करणाऱ्या व्यक्ती (Claimant) व्यतिरिक्त मयताचे इतर वारस असल्यास, त्यांचेकडून देय रक्कमेसंदर्भात विहित नमुन्यातील म्हणजेच Annex I-D प्रमाणे Letter of disclaimer म्हणजेच अस्विकरण पत्र किंवा नाहरकत दाखला (Claimant यास सदर रक्कम देण्यास कोणतीही हरकत नसलेबाबत) घ्यावा. याव्यतिरिक्त अशा प्रकरणामध्ये बँक तिऱ्हाईत व्यक्ती ( ज्यामध्ये रक्कम मागणी न करणाऱ्या वारसांचा समावेश असला पाहिजे) यांचेकडून विहित नमुन्यातील म्हणजेच Annex I-C प्रमाणेचे हमीपत्र घेऊन रक्कम वारसांना अदा करू शकते. याप्रमाणे पूर्तता करून देय रक्कमेचा परतावा केल्यास बँकेस कायदेशीर दायित्वातून मुक्तता मिळते.

७) जोखीम मर्यादेपर्यंतच्या रक्कमेस अनुसरून कोणाही तिऱ्हाईत व्यक्तीकडून हमीपत्र घेऊ नये.

## ४. प्राथमिक बाबी व अनिवार्य कागदपत्रे

४.१ संपूर्ण वारस प्रकणाच्या प्रक्रियेसाठी केवळ आणि केवळ रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी जारी केलेले विहित नमुन्यातील Claim From, हमीपत्र व इतर तत्सम कागदपत्रांचे मसुदे वापरणेचे आहेत.

४.२ मयत खातेदार/सभासद यांचे वारस अर्जदार त्यांना सोईच्या असलेल्या बँकेच्या कोणत्याही शाखेमार्फत वारस प्रकरणासाठी विहित नमुन्यातील Claim From दाखल करु शकतात.

४.३ वारस प्रकरणासाठीच्या क्लेम फॉर्ममध्ये प्रकरणनिहाय लागू माहिती भरणे अनिवार्य आहे. त्यासोबत क्लेम फॉर्ममध्ये मयत व्यक्तिची वेगवेगळ्या शाखांमधील सर्व प्रकारच्या खात्यांचा तसेच सभासद असलेस सभासद क्रमांकाचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

अर्बन को-ऑप. बँक लि. कराड नो. क्र -१३०९ दि.२४/५/१९१७ कोड नं. ०

४.४ वारस प्रकरणासोबत सादर करण्यात येणारी कागदपत्रे मूळ कागदपत्रांवरून प्रमाणित करण्याचा अधिकार कनिष्ठ अधिकारी व त्यावरील श्रेणीतील अधिकाऱ्यांना राहील. सदर कागदपत्रावर संबंधित अधिकारी यांनी स्वत: तपासल्याबाबत सही, शिक्का, सेवक ओळख संकेतांक (EMP CODE) व तारीख नमूद करावी.

४.५ मयताच्या नावे असलेल्या बचत/चालू/मुदत ठेव खात्यामधील रक्कमेची तसेच भाग रक्कमेची मागणी करण्यासाठी खालील दोन प्रकारचे क्लेम फॉर्मचे नमुने आहेत.

- ठेवखात्यास नामनिर्देशन असल्यास / ठेव खाते Surviorship स्वरुपाचे असल्यास– Annex I-A प्रमाणेचा क्लेम फॉर्म
- ठेवखात्यास नामनिर्देशन नसल्यास / ठेव खाते Surviorship स्वरुपाचे नसल्यास– Annex I-B प्रमाणेचा क्लेम फॉर्म

४.६ मयत ठेवीदार/खातेदार यांचा मृत्यूचा दाखला (मूळ/झेरॉक्स प्रत)
(ज्या खातेदारांचा मृत्यू महाराष्ट्र राज्याबाहेर अगर देशाबाहेर झालेला आहे व नामनिर्देशित व्यक्ती अगर मयताचे वारसांना मूळ मृत्यू दाखल्याची एखादी प्रतच उपलब्ध असल्याने ती बँकेकडे जमा करणे शक्य नाही, फक्त अशा अपवादात्मक परिस्थितीत वारस प्रकरण मंजुर होईपर्यंत मूळ मृत्यूचा दाखला दप्तरी घ्यावा आणि त्याची झेरॉक्स प्रत शाखाव्यवस्थापक यांनी स्वत: सही, शिक्यानिशी मूळ मृत्युदाखल्यावरून प्रमाणित करावी.)

४.७ सक्सेशन सर्टिफिकेट

४.७.१ ठेवखात्यास नामनिर्देशन नसल्यास / ठेव खाते Surviorship स्वरुपाचे नसल्यास जोखीम मर्यादा (मुद्दल व व्याजासह) रू.१० लाख व रक्कमेपेक्षा अधिक असल्यास व वारसाची नोंद नसल्यास, सक्षम न्यायालयाचे सक्सेशन सर्टिफिकेट आवश्यक आहे.

४.७.२ जोखीम मर्यादा (मुद्दल व व्याजासह) रू.१० लाख रक्कमेपेक्षा कमी असल्यास आणि सदर रकमे संबंधी कोणाचीही हरकत वा तक्रार दाखल असल्यास रकमेचा विचार न करता सक्षम न्यायालयाचे सक्सेशन सर्टिफिकेट सादर करणे आवश्यक आहे.

४.७.३ मयताचे वारसांनी रक्कम मागणीबाबत मे. न्यायालयाचा आदेश (सक्सेशन सर्टिफिकेट) बँकेकडे सादर केले असेल परंतु सदर आदेशामध्ये काय हिस्सेराशीने रक्कम वारसांना अदा करावी याचा तपशील नमूद केला नसेल आणि त्यामुळे हिस्सा ठरविणे अडचणीचे होत असल्यास; सदर रक्कमेच्या हिस्सेवारीबाबत मे. न्यायालयाकडून योग्य ते आदेश प्राप्त करण्याबाबत अर्जदार यांच्याकडे मागणी करण्याचा बँकेस हक्क व अधिकार राहील.

४.७.४ ज्या ठेव खात्यांना नामनिर्देशन नाही किंवा जी ठेव खाती Surviorship स्वरुपाची नाहीत अशा खात्यांच्या बाबतीत मयत खातेदार यांना थेट वारस (पती, पत्नी, मुलगा, मुलगी, आई, वडील) नसतील व त्यांचे नातेवाईक अथवा अन्य व्यक्ती मयत खातेदाराच्या खात्यावरील रक्कमेची मागणी करत असल्यास आणि एकत्रित मिळणारी रक्कम रु.३ लाखापेक्षा जास्त असल्यास त्याकामी सक्षम न्यायालयाचा वारसा दाखल्याची मागणी करावी आणि रक्कम रु.३ लाखापेक्षा कमी असल्यास रक्कम मागणी करणाऱ्या व्यक्तिंकडून (क्लेमंट) Annex- I-B प्रमाणे क्लेम फॉर्म व Annex- I-

ऑप. बँक लि. कराड
नो. क्र.-१३०१
दि.२४/१/१९९७
कोड नं. ०

C प्रमाणे हमीपत्र अशी कागदपत्रे घेऊन देय रक्कमेचा निपटारा करावा. (याकरिता जोखीम मर्यादेची बाब विचारात घेतली जाणार नाही.)

४.७.५ मा.तहसिलदार, गावकामगार तलाठी यांनी मिळकतीवर केलेल्या किंवा सिटी सर्व्हे रेकॉर्डला वारसाची जी नोंद झाली त्या वारसनोंदीची मूळ नक्कल प्रत, वकील/नगरसेवक/ग्रामपंचायत सदस्य यांचा वारस दाखला.

४.८ मयताच्या नावे असलेल्या सर्व मूळ ठेव पावत्या, बचत/चालू खाते मूळ पासबुक आणि चेकबुक तसेच सभासद असल्यास मूळ भाग दाखला.

४.९ सदर नमूद मूळ ठेव पावत्या, मूळ पासबुक, मूळ भाग दाखला गहाळ झाला असल्यास रक्कम रु.५००/- चे स्टॅम्प पेपरवर नोटराराईज्ड बंधपत्र (Indemnity Bond) (नमुना - ४) नामनिर्देशित व्यक्ती किंवा कायदेशीर वारसांकडून घ्यावे.

४.१० नामनिर्देशित व्यक्तीच्या अगर कायदेशीर वारसांचे कोणतेही एक Officially Valid Document (OVD) च्या साक्षांकित प्रती घ्याव्यात. (पासपोर्ट, ड्रायव्हिंग लायसेन्स, निवडणूक आयोगाने जारी केलेले मतदान ओळखपत्र, NREGA यांनी जारी केलेले जॉब कार्ड ज्यावरती राज्य शासनाच्या अधिकाऱ्याची सही असेल, Unique Identification Authority of India यांनी जारी केलेले आधार कार्ड इ.) आणि रंगीत फोटो.

४.११ खातेदार मयत झाल्याबाबत माहिती शाखेकडे लेखी स्वरुपात प्राप्त झाल्यानंतर मयत खातेदाराच्या सर्व खात्यांवरील नावे व्यवहार तत्काळ थांबविण्यात येतील. कोअर बँकिंग प्रणालीत (CBS) मयत खातेदाराचा आय.डी. ला डेथ मार्क करणे. मयत खातेदाराच्या मृत्यू तारखेपूर्वीची तारीख नमूद असलेले चेक स्विकारता येणार नाहीत, तसेच त्याची रक्कम अदा करता येणार नाही.

४.१२ मयत व्यक्तीच्या नावे असणारी सर्व प्रकारची कर्ज खाती व ते जामीन असलेली कर्ज खाती बंद झाल्याशिवाय नामनिर्देशित व्यक्ती, वारस अगर सहखातेदार यांना वारस प्रकरणाची रक्कम देता येणार नाही. परंतु सदर बाबतीत कर्ज रक्कम, कर्ज मुदत, कर्जखात्याची स्थिती, ठेवींची रक्कम व ठेवीचा कालावधी या बाबींचा विचार करुन ठेवींची रक्कम कर्जखात्यात भरुन घेण्यास प्राधान्य द्यावे. अशाबाबतीत कर्ज व वसुली विभागाशी संपर्क साधून त्याचे मार्गदर्शनाप्रमाणे कार्यवाही करावी.

४.१३ मयत व्यक्तीच्या नावे असलेल्या ठेवीवर कर्ज अदा करता येणार नाही.

४.१४ वारस प्रकरणामध्ये वारसांकडून घ्यावयाचे विविध नमुन्यांमध्ये वस्तुनिष्ठ व परिस्थितीजन्य सर्व तो आवश्यक अतिरिक्त मजकूर आवश्यक असल्यास समाविष्ट करावा.

## ५. मृत्युपत्रान्वये देय असलेल्या ठेव रक्कमे बाबत -

ज्या प्रकरणामध्ये मयत ठेवीदाराने मृत्यूपत्र लिहून ठेवले आहे व असे मृत्यूपत्र वादातीत नाही /मृत्युपत्रास अनुसरून कोणतीही बाब न्यायप्रविष्ट नाही, अशा बाबतीत मृत्युपत्र शाबित (Probate चा दाखला घेणे) करून घेतले नंतर किंवा Letter of Administration घेतले नंतर, रक्कम घेणाऱ्या व्यक्तीकडून (Claimant) त्याच्या सहीचा विहित नमुन्यातील म्हणजेच Annex I-B प्रमाणेचा Claim Form, मयताचा मृत्यचा दाखला, रक्कम मागणी करणाऱ्या व्यक्तीचे (Claimant) याचे Officially Valid Document म्हणजेच OVD (वर नमूद केले प्रमाणे) ई. कागदपत्रे घ्यावीत व रक्कम अदा करावी.



को-ऑप. बँक लि. कराड नो. क्र. १३०९ दि.२४/७/१९९७

ज्या प्रकरणामध्ये मृत्यूपत्रान्वयेची लाभार्थी व्यक्ती ही मयताचे वारसा व्यतिरिक्त इतर कोणीही व्यक्ती असेल त्या प्रकरणी रक्कम घेणाऱ्या व्यक्तीकडून (Claimant) त्याच्या सहीचा विहित नमुन्यातील म्हणजेच Annex I-B प्रमाणेचा Claim Form, मयताचा मृत्यचा दाखला, रक्कम मागणी करणाऱ्या व्यक्तीचे (Claimant) याचे Officially Valid Document म्हणजेच OVD (वर नमूद केले प्रमाणे) इ. कागदपत्रे घ्यावीत व रक्कम अदा करावी.

याउपर, सादर करण्यात आलेल्या मृत्यूपत्राबाबत वारस तथा लाभार्थी यांचे मध्ये वाद नसल्यास व सादर केलेले मृत्युपत्र कायदेशीर, सुयोग्य व सत्य असल्याची बँकेस खात्री पटल्यास, अशा प्रकरणी बँक प्रोबेटची मागणी न करता मृत्यपत्रामध्ये नमूद प्रमाणे देय रक्कमेचा निपटारा करू शकते. अशा प्रकरणी बँकेने, रक्कम स्वीकारणाऱ्या व्यक्तीकडून त्याच्या सहीचे Annex I-C प्रमाणे विहित नमुन्यातील हमीपत्र , मयताचा मृत्यू दाखला व रक्कम स्वीकारणाऱ्या व्यक्ती (Claimant) व्यतिरिक्त मयताचे इतर वारस असल्यास, त्यांचेकडून देय रक्कमेसंदर्भात Annex I-D प्रमाणेचे विहित नमुन्यातील Letter of disclaimer म्हणजेच अस्विकरण पत्र किंवा नाहरकत दाखला (Claimant यास सदर रक्कम देण्यास कोणतीही हरकत नसलेबाबत) घेवून, देय रकमेचा निपटारा करेल.

### ५.१ मृत्यूपत्रान्वये अगर अन्य प्रकारे देय असलेल्या ठेव रक्कमेबाबत वाद असल्यास -

देय असलेल्या रक्कमेबाबत मयताच्या वारसांमध्ये अगर मृत्यूपत्राच्या बाबतीत लाभार्थ्यांच्या मध्ये वाद असल्यास अशा प्रकरणी बँक अनुक्रमे वारसा दाखला / कोर्टाचा आदेश अथवा हुकूमनामा / प्रोबेट दाखला / Letter of Administration (लागू बाब) या बाबींसोबत रक्कम घेणाऱ्या व्यक्तीकडून (Claimant) त्याच्या सहीचा विहित नमुन्यातील म्हणजेच Annex I-B प्रमाणेचा Claim Form, मयताचा मृत्यचा दाखला, रक्कम मागणी करणाऱ्या व्यक्तीचे (Claimant) याचे Officially Valid Document म्हणजेच OVD (वर नमूद केले प्रमाणे) इ. कागदपत्रे मागणी करून त्यानंतर देय रक्कमेचा निपटारा करेल. तथापि, देय रक्कमे संदर्भात मे. कोर्टाचा स्थगिती आदेश असल्यास, असा स्थगिती आदेश रद्द झाले शिवाय वारस प्रकरणाचा निपटारा करता येणार नाही अगर त्या बाबतीत कोणताही निर्णय घेता येणार नाही.

वर नमूद प्रमाणे प्रकरणामध्ये बँक तिऱ्हाईत व्यक्तीकडून हमीपत्राची मागणी करणार नाही.

## ६. महत्वपूर्ण बाबी

६.१ धोरणासोबत देण्यात आलेल्या विविध विहित नमुन्यांमध्ये कोणताही बदल करण्याचा नाही. सदर नमुने व त्यामधील संपूर्ण मजकूर तपासून मगच ते नोंदणीकृत करावेत त्यामध्ये कोणतीही खाडाखोड नसावी. क्लेमंट यांचेकडून प्राप्त होणारे अर्ज व इतर तत्सम कागदपत्रे दिलेल्या विहित नमुन्याप्रमाणे असल्याची खात्री शाखा व्यवस्थापक अगर अधिकारी यांनी करण्याची आहे.

६.२ मयत खातेदाराच्या नावाने बँकेकडे असणारी चालू / बचत / मुदत ठेव खाते / सभासदत्त्व रक्कम अशी एकूण देय रक्कम रु.१०,०००/- पेक्षा अधिक नसल्यास अशा वारस प्रकरणी शाखाव्यवस्थापक यांच्या अधिकारात प्रतिज्ञापत्र (Affidivit), बंधपत्र (Indemnity Bond) न घेता उर्वरित कागदपत्रांची पूर्तता झालेनंतर नामनिर्देशित व्यक्ती अगर नेमले वारसांना रक्कम देण्यात यावी. मात्र कायदेशीर अडचण किंवा तक्रार असलेल्या वारस प्रकराणाच्या बाबतीत आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन रक्कम अदा करावी.

६.३ बँक पॉलिसी व नियमानुसार आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पूर्तता अर्जदार /क्लेमंट / वारसांनी केल्यानंतर मंजुरीच्या ज्या अधिकार कक्षेत सदर प्रकरण येत आहे त्या संबंधित अधिकाऱ्यांनी सदर वारस प्रकरणाचा निपटारा वारस प्रकरण बँकेकडे दाखल झालेपासून पंधरा दिवसांच्या आत करणे बंधनकारक आहे.

६.४ वारस प्रकरण निपटारा करण्यासाठी वर नमूद मुद्द्यामध्ये कालमर्यादा निश्चित केली असली तरी, रिझर्व्ह बँकेच्या वेळोवेळी प्रसिद्ध होणाऱ्या परिपत्रकीय सूचनांनुसारच निश्चित केलेली कालमर्यादा अंतीम मानली जाईल.

६.५ सोबतच्या Death Claim Report नमुन्यामध्ये मंजूर वारस प्रकरणाची माहिती एक्सेलमध्ये अद्ययावत ठेवावी. सदर माहितीची मासिक तपासणी त्या शाखेच्या शाखा नियंत्रक एक्झिक्युटिव्ह यांनी दरमहा करून तपासलेबाबत स्वाक्षरी करण्याची आहे. तसेच सदरचे Death Claim Report दरमहा आणि वार्षिक ( १ एप्रिल ते ३१ मार्च) hradmin@karadurbanbank.com या ई-मेल आय.डी.वर मेल करावेत. दरमहाचा Report पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत आणि वार्षिक रिपोर्ट २० एप्रिल पर्यंत पाठवावेत.

६.६ मयत खातेदाराच्या खात्यावरील रक्कम, कोणत्याही परिस्थितीत रोखीने अदा करण्याची नाही. मयत खातेदाराच्या खात्यांवरील रक्कम त्याचे वारसांना / क्लेमंट अगर नामनिर्देशित व्यक्तीस अदा करत असताना रक्कम नामनिर्देशित व्यक्ती अगर वारसांच / क्लेमंट नावे बँकेकडे असणाऱ्या खात्यावर जमा करण्यात यावी. परंतु, सदर रक्कम नामनिर्देशित व्यक्ती अगर वारसांनी डी.डी., रिअल टाईम ग्रॉस सेटलमेंट (RTGS), नॅशनल इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर (NEFT) इत्यादी निधी हस्तांतर करण्याच्या मार्गाने मिळण्याची विनंती केल्यास त्याप्रमाणे सदर रक्कम वारसाचे अगर नामनिर्देशित व्यक्तीच्या / क्लेमंट इतर बँकेतील खात्यामध्ये वर्ग करता येईल. अशावेळी अन्य बँकांतील खात्याबाबत खातरजमा करण्यासाठी सदर बँकेतील पासबुकची किंवा खाते उताऱ्याची प्रमाणित झेरॉक्स प्रत किंवा कॅन्सल्ड चेक दप्तरी घेणे आवश्यक आहे.

६.७ कोणत्याही वारस प्रकरणाबाबत हरकत वा तक्रार उपस्थित झाल्यास तक्रारदार यांना त्यांच्या तक्रारीस अनुसरून त्यांनी सक्षम न्यायालयाचा स्थगिती आदेश किंवा सक्सेशन सर्टिफिकेट किंवा कोर्टात सक्सेशन सर्टिफिकेट मिळण्यासाठी दाखल केलेल्या अर्जाची कोर्टाच्या सही शिक्यानिशी सर्टिफाईड नक्कल १० दिवसांचे आत सादर करावी, अन्यथा तक्रारीची दखल घेतली जाणार नाही अशा आशयाचे पत्र बँकेच्या लेटरहेडवर 'रजिस्टर ए.डी.' पत्राद्वारे पाठवावे किंवा सदर पत्र हस्ते (समक्ष) तक्रारदार यांना देवून सदर पत्राची प्रत समक्ष पोच घेतली पाहिजे. दिलेल्या पोहोचवरील सही ही त्यांचीच असल्याची खात्री करावी. तसेच, अशाप्रसंगी बँकेने दिलेले पत्र तक्रारदार यांना मिळालेल्या तारखेपासून १० दिवस गृहीत धरावे.

## ७. मयताच्या नावे असलेल्या ठेव खात्यास नामनिर्देशन असल्यास/ ठेव खाते Surviorship स्वरुपाचे असल्यास सदर खात्यांच्या बाबतीत करावयाची कार्यवाही

ज्या ठेव खात्यास ठेवीदाराने नामनिर्देशन (Nomination) केले आहे, अशा ठेव खात्यांच्या बाबतीत, ठेवीदाराचा मृत्यू झाल्यास नामनिर्देशित व्यक्तीस आणि जे ठेव खाते/ खाती Survivorship स्वरूपाची उदा. Either or Survivor किंवा Former or Survivor किंवा Later or Survivor किंवा Anyone or Survivor स्वरूपाची आहेत. अशा खात्यांच्या बाबतीत सहखातेदार मयत झाल्यास, हयात खातेदारास सदर खात्यावरील रक्कम अदा केल्यास बँकेस दायित्वामधून मुक्तता मिळते. परंतु, सदर प्रकारे रक्कम अदा करण्यापूर्वी खालील गोष्टींची पूर्तता करणे गरजेचे आहे -

१) मयत ठेवीदार / खातेदार याची व अशा खात्याना असलेल्या नामनिर्देशित व्यक्तीची, तसेच Survivorship स्वरूपाच्या खात्यांच्या बाबतीत मयताची व हयात सहखातेदाराची कागदोपत्री पुराव्यानिशी योग्य ओळख पटवून घ्यावी.

२) वारस प्रकरणाचा निपटारा करते तारखेस, ठेव पावतीच्या बाबतीत मयताच्या खात्यावरील रक्कम नामनिर्देशित व्यक्तीस अदा करणेबाबत व Survivorship खात्यांच्या बाबतीत हयात सहखातेदारास त्या खात्यावरील रक्कम अदा करणेस कोणत्याही सक्षम न्यायासनाचा स्थगिती आदेश नसल्याची खात्री करावी.

३) नमूद प्रकारच्या ठेवी / Survivorship खात्यावरील रक्कम अदा करताना, नामनिर्देशित व्यक्तीस / हयात सहखातेदारास बँकेतर्फे असे लेखी सूचित करणे गरजेचे आहे की, त्यांना देण्यात आलेली रक्कम ही मयताच्या वारसांचे विश्वस्त या नात्याने त्यांना देण्यात आलेली असून, त्यामुळे नामनिर्देशित व्यक्तीच्या विरुद्ध तसेच Survivorship खात्यांच्या बाबतीत हयात सहखातेदाराच्या विरुद्ध कोणत्याही व्यक्तीचा संबंधीत ठेव रक्कमेवरील / Survivorship खात्यामधील रक्कमेवरील त्यांचा हक्क / अधिकार संपुष्टात येणार नाही.

४) नामनिर्देशित व्यक्तीचा हक्क हा ठेवीदार मयत झाले नंतरच निर्माण होईल.

- ठेवींच्या बबतीत नामनिर्देशित व्यक्तिस आणि Survivorship स्वरूपाच्या खात्यांच्या बाबतीत हयात सहखातेदारास वर नमूद केलेल्या निकषांचे पालन करून रक्कम अदा केल्यास बँकेस कायदेशीर दायीत्वातून मुक्तता मिळते. त्यामुळे अशा प्रकारे रक्कम अदा करत असताना, बँकेने नामनिर्देशित व्यक्तीकडून / हयात सहखातेदाराकडून वारसा दाखला, मृत्युपत्र शाबित करून मागणे, हमीपत्र, Letter of Administration यासारख्या कागदपत्रांची सक्ती न करता केवळ खालील कागदपत्रे सादर करणेची मागणी करावी.

१. नामनिर्देशित व्यक्ती / हयात सहखातेदार (Survivorship खाते असल्यास) यांचे सहीचा विहित नमुन्यातील Annex I-A प्रमाणेचा Claim Form आवश्यक माहितीसह सविस्तर भरून घ्यावा. ( सदर क्लेम फॉर्म मधील गैरलागू मजकूर खोडवा)

२. मयताचा मृत्यचा दाखला घ्यावा.

३. रक्कम मागणी करणाऱ्या व्यक्तीचे म्हणजेच दावेदार / हक्कदार / क्लेमंट ( Claimant ) याचे कोणतेही एक Officially Valid Document (OVD) घ्यावे. ज्यामध्ये पासपोर्ट, ड्रायव्हिंग लायसेन्स, निवडणूक आयोगाने जारी केलेले मतदान ओळखपत्र, NREGA यांनी जारी केलेले जॉब कार्ड ज्यावरती राज्य शासनाच्या अधिकाऱ्याची सही असेल, Unique Identification Authority of India यांनी जारी केलेले आधार कार्ड ई. चा समावेश असेल.

## ८. नामनिर्देशनाबाबत महत्वाचे -

### नामनिर्देशन (Nomination) सुविधा :-

बँकिग कायदे (सुधारणा) अधिनियम, २०२५ अंतर्गत नामनिर्देशनाशी संबंधित प्रमुख तरतुदी दि.१ नोव्हेंबर २०२५ पासून अंमलात आली आहे. प्रत्येक ठेव खातेसाठी ठेवीदारांना चार व्यक्तीचे नॉमिनी म्हणून नॉमिनेशन करता येईल. याबाबत बँकिंग नियमन कायद्यात बदल झालेला आहे. जर ठेवीधारास ठेव खातेसाठी नॉमिनेशन करावयाचे नसेल तर तसे ठेवीदारांकडून ठेव खातेस नॉमिनी नोंद करणार नसलेबाबत स्वतंत्र लेखी पत्र घेणे आवश्यक असून शाखा व्यवस्थापकाचे त्या पत्रावर Approval असणे बंधनकारक आहे.

नामनिर्देशन/रद्द केलेले नामनिर्देशन/बदल केलेले नामनिर्देशन यांच्या अंमलबजावणीमध्ये केवळ ठेवींच्या नुतनीकरणामुळे कोणतेही बदल होणार नाहीत.

संयुक्त खातेदारांच्या ठेवींचे नामनिर्देशन रद्द करताना अथवा त्यामध्ये बदल करताना हयात असलेल्या सर्व खातेदारांची मंजुरी असणे गरजेचे आहे.

जर नामनिर्देशित व्यक्ती (अल्पवयीन) अज्ञान असल्यास, ठेवींदारांनी नामनिर्देशन करताना अज्ञान व्यक्तीच्या वतीने रक्कम स्विकारण्यासाठी सज्ञान व्यक्तीची नेमणूक करावी. जास्तीत जास्त ठेवीसाठी नामनिर्देशन करण्यासाठी ठेवीदारांना उद्युक्त करावे.

- बँक ग्राहकांना आता आपल्या सर्व प्रकारच्या ठेव खात्यांना एकाऐवजी जास्तीत जास्त चार जणांचे नामनिर्देशन करता येईल. ठेव खात्यात एकाच वेळी (Simultaneous) तसेच क्रमिक/एकापाठोपाठ एक (Successive) अशाप्रकारे नामनिर्देशन करता येईल.

- **एकाच वेळी (Simultaneous)**

  एकाचवेळी चार जणांचे नामनिर्देशन ह्याचा अर्थ असा, की आता जे फक्त एकाच व्यक्तीचे नामनिर्देशन करता येते त्याऐवजी आधिक व्यक्तींचे पण जास्तीत जास्त चार जणांचे नामनिर्देशन करता येईल. ह्या चार जणांना ठेवीच्या किती टक्के रक्कम दिली जावी हेही नामनिर्देशन करतेवेळी स्पष्ट करावे लागेल. नामनिर्देशन संपूर्ण ठेव रकमेसाठी करावे लागेल. एकूण रक्कम १०० टक्के सुनिश्चित केलेली आहे. सर्व नॉमिनी व्यक्तींमध्ये पारदर्शक वितरण सक्षम करतात ह्या तरतुदींचे पालन न करता केलेले नामनिर्देशन ग्राह्य धरले जाणार नाही.

- बँकेकडून ठेवीची रक्कम परत मिळण्याअगोदर जर एखाद्या नामनिर्देशित व्यक्तीचा मृत्यू झाला तर केवळ अशा नामनिर्देशित व्यक्तीचे नामनिर्देशनच रद्द झाले असे धरले जाईल व फक्त त्याच्या वाट्याचीच रक्कम नामनिर्देशनाविरहित आहे असे समजले जाईल. इतरांच्या नामनिर्देशनाला व त्यांना त्यांच्या वाट्याचे पैसे मिळायला त्यामुळे काही बाधा येणार नाही.

- **क्रमिक/एकापाठोपाठ एक (Successive)**

  ह्या पद्धतीने केलेले नामनिर्देशन केवळ एका व्यक्तीच्या बाबतीतच प्राधान्यक्रमानुसार प्रभावी होईल. ह्याचा अर्थ असा, की प्रथम क्रमांकावरील नामनिर्देशित व्यक्ती जर ज्या व्यक्तीने नामांकन केले आहे त्याच्या पश्चात हयात असेल तर त्याचे नामनिर्देशन प्रभावी धरण्यात येईल व त्याला पैसे देण्यात येतील. दुसऱ्या नामनिर्देशित व्यक्तीचे नामनिर्देशन पहिल्या नामनिर्देशित व्यक्तीच्या मृत्यूनंतरच प्रभावी होईल. नामनिर्देशनाच्या यादीत सर्वात खालच्या क्रमांकावर असलेल्या नामनिर्देशित व्यक्तीचे नामनिर्देशन यादीत ज्यांचे नाव वरती आहे अशा सर्व नामनिर्देशित व्यक्तींच्या मृत्यूनंतरच प्रभावी होईल. ठेवीदाराला/ग्राहकाला नामनिर्देशनाचा प्राधान्य क्रम ठरवण्याची मुभा असेल. परंतु जिथे नामनिर्देशनाचा प्राधान्यक्रम ठेवीदाराने/ ग्राहकाने नमूद केला नसेल तिथे यादीत ज्या क्रमाने नावे दिलेली आहेत त्या क्रमाने नामनिर्देशन करण्यात आल्याचे मानले जाईल. एकाहून अधिक व्यक्तींच्या नावे एकाच वेळी केलेल्या नामांकनांना (simultaneous) या कलमाच्या तरतुदी लागू होणार नाहीत.

- नामनिर्देशित व्यक्तीचे ठेवीदारापूर्वी निधन झाल्यास व ठेवीदार/ ग्राहक नवीन नामांकन करण्यास विसरल्यास ह्या सुविधेमुळे ठेव खाते नामनिर्देशनाविरहित राहाण्याचे टळेल. ठेव रक्कम नामनिर्देशनाविरहित असेल, तर वारसांना पैसे देण्यासाठी जी किचकट प्रक्रिया करावी लागते ती ह्या सुविधेमुळे करावी न लागता पुढील क्रमांकावरील नामनिर्देशित व्यक्तीला बँक पैसे/वस्तू देऊ शकेल. ह्या सुधारणांमुळे भविष्यात बँकिंग उद्योगात दावा न केलेल्या ठेवींचे प्रमाण कमी होईल.

**टीप :- ठेवीदारांना एकाच वेळी (Simultaneous) किंवा क्रमिक/ एकापाठोपाठ एक (Successive) या दोन्हीमध्ये विकल्प करता येईल.**

अर्बन को-ऑप. बँक लि. कराड. नों. क्र.-१३०९ दि.२४/१/१९१७ कोड नं. ०

**नवीन बचत/चालू ठेव खात्यांमधील नामनिर्देशनाबाबत (Nomination)**

- रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या मागील काही सूचनांप्रमाणे व्यक्तिगत ठेव खात्यांमध्ये नामनिर्देशन असल्याबाबत विशिष्ठ मागोवा घेतल्याचे जाणवते.
- त्यामुळे व्यक्तिगत ठेव खात्यास (म्हणजेच वैयक्तिक आणि प्रोपरायटीशीप खातेदारांना मात्र) नामनिर्देशन सुविधा उपलब्ध राहील. प्रतिनिधी द्वारे वापरत असलेल्या ठेव खात्यांना (HUF/Partnership/ LLP/ Company/ Society/Trust) नामनिर्देशन सुविधा उपलब्ध राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.
- त्यामुळे नव्यान उघडल्या जाणाऱ्या व्यक्तिगत स्वरुपातील बचत ठेव आणि प्रोप्रा. स्वरूपातील चालू ठेव खात्यांना नामनिर्देशन असायलाच पाहिजे. जिथे ग्राहक स्वत: नामनिर्देशनास नको असे म्हणतात ज्या-त्या बचत ठेव फॉर्ममध्ये तसे नमूद करावे किंवा स्वतंत्रपणे लेखी पत्राद्वारे लिहून द्यावे.

यापुढे ज्या नवीन उघडल्या जाणाऱ्या व्यक्तिगत बचत/चालू ठेव खाते आणि प्रोप्रा स्वरूपातील चालू ठेव खात्यांना नामनिर्देशन नसेल अशा शाखेनिहाय खात्यांना आढावा घेतला जाईल. ग्राहकांनी नामनिर्देशन नको असे लिहून दिल्याचा पुरावा नसल्यास संबंधित शाखेला समज दिला जाईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

## ९. हिंदू अविभक्त कुटुंब यांची खाती (Hindu Undivided Family)

हिंदू अविभक्त कुटुंब खात्याच्या बाबतीत कुटुंबातील सर्व सदस्य या खात्याशी संबंधित असतात. तसेच मृत्यूपत्र हे वारसाहक्काने आलेल्या किंवा स्वकष्टार्जित मिळकतीच्या बाबतीत केले जात असल्याने कर्त्याचे मृत्यूपत्र असले तरीदेखील अशी खाती मृत्यूपत्रात समाविष्ट केली असली तरी कुटुंबातील सर्व सदस्यांच्या संमतीशिवाय नवीन कर्ता नेमता येत नाही किंवा त्या खात्यातील रक्कम परत देता येत नाही. कारण हिंदू अविभक्त कुटुंबाच्या मिळकतीबाबत कर्त्याने सदर एकत्रित मिळकतींविषयीचे मृत्यूपत्र करण्याबाबत कायद्यात तरतूद नाही. तसेच अशा खात्यांना नामनिर्देशनदेखील करता येत नाही, नामनिर्देशन करावयाचे झाल्यास कुटुंबातील सर्व सदस्यांनी एकमताने उत्तराधिकारी नेमणे आवश्यक असते.

९.१ हिंदू अविभक्त कुटुंब खात्याच्या बाबतीत कर्त्याचा मृत्यू झाल्यावर सदर खात्यावरील सर्व व्यवहार स्थगित करण्यात यावेत. सदर खात्यावर व्यवहार पुन्हा पूर्ववत सुरू करण्यासाठी कुटुंबातील सर्व सदस्यांनी नवीन कर्ता नेमणे आवश्यक असते.

९.२ हिंदू अविभक्त कुटुंबातील सर्व सदस्यांकडून नवीन कर्ता नेमल्याबाबत व त्यास अधिकार दिल्याबाबत रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर तहसीलदार यांचेसमोर नोंदणी केलेले किंवा नोटराईज्ड केलेले संमतीपत्र (नमुना-७) दसरी घेणे आवश्यक आहे. संमतीपत्रात खालील मुद्यांचा समावेश असावा.

९.३ कर्त्याच्या मृत्यूचा दाखला आणि त्याचबरोबर कर्ता मृत झाल्याने त्याचे नाव बँक खात्यावरून कमी करण्याबाबत तपशील.

९.४ बँकेमधील हिंदू अविभक्त कुटुंब खाती व त्यातील रक्कमेचा तपशील.

९.५ कुटुंबातील सदस्यांनी नेमलेल्या नवीन कर्त्याचे नाव व त्याचे मृत कर्त्याशी असणारे नाते

९.६ नवीन कर्ता नियुक्ती हिंदू अविभक्त कुटुंबातील इतर सर्व सदस्यांच्या संमतीने करण्यात येत असून त्यास इतर कुटुंबीयांची कोणतीही हरकत नसल्याचा तपशील त्यात नमूद असावा. (नवनियुक्त कर्ता हा त्या हिंदू अविभक्त कुटुंबातील ज्येष्ठ पुरूष व्यक्ती असणे आवश्यक आहे.)

९.७ संमतीपत्रामध्ये बँकेकडील सर्व रक्कम स्वीकारण्याबाबत तसेच त्याअनुषंगाने सर्व व्यवहार करण्याबाबत कुटुंबातील सर्व सदस्यांनी संमती देणे आवश्यक आहे.

९.८ भविष्यात सदर रकमेबाबत काही हरकत, वाद, तक्रार उपस्थित झाल्यास त्याची तोषीस बँकेस लागू न देणेबाबत व त्याचे निराकरण सर्वस्वी नियुक्त केलेल्या कर्त्याने व कुटुंबातील सर्व सदस्यांनी करण्याची हमी बँकेस देणे इत्यादी.

वर नमूद केल्यानुसार सर्व तपशील संमतीपत्रात नमूद असणे आवश्यक आहे.

## १०. संयुक्त आणि Survivourship स्वरुपाच्या खात्याच्या बाबतीत,

१०.१ एका/एकापेक्षा जास्त खातेदारांचा मृत्यू झाला आणि खाते मुदतपूर्व बंद करावयाचे असल्यास, मृत्यू झालेल्या खातेदारांचे वारसदार आणि अन्य हयात खातेदार यांच्या संमतीने खाते बंद करता येईल आणि हयात खातेदार व मयताचे वारस यांच्या सूचनेनुसार रक्कम अदा करण्यात येईल.

१०.२ एका/एकापेक्षा जास्त खातेदारांचा मृत्यू झाला आणि खाते मुदतीनंतर बंद होत असल्यास, हयात खातेदारांना रक्कम अदा केली जाईल. मयत खातेदारांच्या वारसांचा संबंध विचारात घेऊ नये.

१०.३ संयुक्त मुदत ठेव पावती किंवा Survivorship स्वरुपाच्या मुदतठेव पावतीच्या बाबत, एखाद्या खातेदाराच्या मृत्यूनंतर, सदर मुदत ठेव मुदत पूर्व मोडायची झाल्यास, अशा प्रसंगी हयात खातेदार व मयत खातेदार याच्या वारसांची संमती घेण्यात यावी.

Survivorship स्वरूपाच्या खात्यांच्या बाबतीत, मुदत ठेव ठेवतेवेळी किंवा मुदत ठेवीच्या कालावधी दरम्यान केव्हाही, सर्व सहखातेदारांनी, ठेवलेली मुदतठेव, मुदतपूर्व मोडणेबाबत लेखी अनुमती दिली असल्यास, अशा प्रकरणी, सह खातेदाराच्या मृत्यूमुळे हयात खातेदारास मुदतपूर्व मुदत ठेव रक्कम अदा करण्यास कोणतीही अडचण नाही व याकामी मयत खातेदाराच्या वारसांची संमतीची आवश्यकता नाही

१०.४ कोणत्याही प्रकारचा जादा व्याजदराचा लाभ संबंधित खात्यास लागू असेल तर तो मुदतीपर्यंत कायम राहील.

१०.५ मुद्रांक अधिनियमातील तरतुदीनुसार प्रतिज्ञापत्र व बंधपत्र (Indemnity Bond) यासाठी लागणारा मुद्रांक (Stamp) याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. तरी मुद्रांक अधिनियमातील वेळोवळी होणारे बदल यानुसार मुद्रांक आकारणी करावी.

## ११. परागंदा ठेवीदारांच्या देय ठेव रक्कमे बाबत-

परागंदा ठेवीदाराच्या वारसांनी/ नामनिर्देशित व्यक्तीने भारतीय साक्ष अधिनियम २०२३ चे कलम ११० किंवा १११ अन्वये सक्षम न्यायालयाकडून परागंदा व्यक्ती बाबत आदेश पारित करून घेणे (Civil Death Declaration) अनिवार्य आहे. अशा प्रकारे आदेश पारित करून घेतले नंतर, मयत ठेवीदाराचे नावे असलेल्या ठेव रक्कमेचा बँकेद्वारे निपटारा करण्यासाठी जी कार्यवाही / प्रक्रिया अवलंबली जाते ती या प्रकरणी अवलंबण्यात यावी.

तथापि, अशा प्रकरणामध्ये, सर्वसामान्य व्यक्तींना अनाठायी होणारा त्रास वाचवण्यासाठी व वरील कार्यपद्धतीस लागणारा कालावधी जास्त असल्या कारणाने, सदर प्रकरणी मुख्य कार्यालयामार्फत जोखीम मर्यादा निश्चित केली असून त्याअंतर्गत रक्कम रु.१० लाखांपर्यंतची कोणत्याही स्वरुपाची ठेव रक्कम मागणी करणारी प्रकरणे मुख्य कार्यालय पातळीवर मंजूर करण्यात येतील. त्यासाठी शाखा सचिव यांच्या शिफारशीसह संबंधित वारसाकडून खालील अतिरिक्त कागदपत्रे प्राप्त करून घ्यावीत.

११.१ ठेवीदार/खातेदार बेपत्ता असलेबाबत त्याचे वारसांनी संबंधित पोलीस स्टेशन मध्ये दाखल केलेल्या तक्रारीची/एफ.आय.आर.ची साक्षांकित प्रत (मूळ प्रत शाखा व्यवस्थापक यांनी स्वत: तपासून घ्यावी)

११.२ संबंधित पोलीस स्टेशन कडून, बेपत्ता व्यक्तीचा तपास घेवूनही सदर व्यक्ती सापडून येत नसलेबाबतच्या अहवालाची प्रत

११.३ वारसांचे बंधपत्र (Indemnity Bond) (नमुना-११)

- वर नमूद प्रमाणे कागदपत्रांची पूर्तता झालेनंतर बेपत्ता व्यक्तीच्या मुदत ठेवी, बचत/चालू खात्यास तसेच लॉकर यास अनुसरून मयताच्या नावच्या ठेव रक्कमेची अथवा बचत किंवा चालू खात्यामधील रक्कमेची अगर लॉकर मधील चीज, वस्तू, जिन्नस याची मागणी करणेबाबतचा मयताच्या सर्व वारसांचा एकत्रित अर्ज (नमुना-९) आणि मयताच्या सर्व वारसांनी सदरकामी त्यांचेपैकी कोणाही एकाच्या नावे रक्कम वर्ग करण्यास अगर लॉकर मधील चीज, वस्तू, जिन्नस स्विकारणेस त्यांचे पैकी एका वारसास नियुक्त केले असल्यास त्याबाबतचे सर्व वारसांचे सही असलेले तहसीलदार यांच्यासमोर नोंदणीकृत केलेले अगर नोटराईज्ड केलेले रक्कम रु.५००/- चे स्टॅम्प पेपरवरील संमती विषयीचे मूळ प्रतिज्ञापत्र (नमुना-१०) दप्तरी घ्यावे. सदर नियुक्त वारसांचे अर्जामध्ये ठेव पावत्यांचा अथवा खात्यामधील रक्कमेचा स्पष्ट उल्लेख केलेला असणे गरजेचे आहे.
- सर्व वारसांकडून रक्कम रु.५००/- चे स्टॅम्प पेपर वरील मयताचे नावच्या ठेवी व खात्यांमधील रक्कम तसेच लॉकर मधील चीज, वस्तू, जिन्नस यास अनुसरून नोटराईज्ड बंधपत्र (Indemnity Bond) (नमुना-११) घेण्यात यावे व तदनंतर संबंधित वारसाचे खात्यावर रक्कम वर्ग करावी अगर लॉकर मधील चीज, वस्तू, जिन्नस नियुक्त वारसाचे ताब्यात द्यावीत.
- मयतास एकमेव वारस असल्यास त्याच्या कडून वर नमूद प्रमाणे कार्यवाही करून व कागदपत्रे घेवून , रक्कम रु. ५००/- चे स्टॅम्प पेपर वरील मयताचे नावच्या ठेवी व खात्यांमधील रक्कम याबाबतचे बंधपत्र (Indemnity Bond) घ्यावे व संबंधित वारसास मयताच्या नावची रक्कम अदा करावी.
- बेपत्ता व्यक्तीने धारण केलेल्या भागदाखल्याची रक्कम सदरकामी वर नमूद प्रमाणे मे. न्यायालयाने सदर बेपत्ता व्यक्तीची Civil Death झालेबाबत जाहीर केले शिवाय नामनिर्देशित व्यक्तीस अगर वारसांना अदा करता येणार नाही.

**१२. ठेवीदाराच्या मृत्यूपश्चात, मुदतठेव मुदतपूर्व मोडणेबाबत –**

बँकेच्या ठेव धोरणातील तरतुदींनुसार याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

**१३. मयताच्या नावच्या ठेव रक्कमेचा बँकेद्वारे निपटारा केले नंतर (After settlement of claim), मयताचे नावे खात्यामध्ये रक्कम जमा झाले नंतर करावयाची कार्यवाही –**

मयताच्या नावच्या ठेव रक्कमेचा बँकेद्वारे निपटारा केले नंतर मयताच्या नावे काही रक्कम बँकेकडे जमा झाल्यास, खातेदार मयत झालेचा शेरा नमूद करून, सदर रक्कम, बँक, जमा देणाऱ्या व्यक्तीस परत करेल व याबाबत मयताचे वारस/ नामनिर्देशित व्यक्ती/ सहखातेदार यांना सूचित करेल.

अर्बन को-ऑप. बँक लि. कराड
नो. क्र/-१३०९
दि.२४/१/१९१७
कोड नं. ०

१४. लॉकरबाबत–

१४.१ लॉकरखात्यास नामनिर्देशन (Nomination) असल्यास–

- लॉकरधारकाने त्याच्या लॉकर मधील चीज, वस्तू, जिन्नस स्वीकारण्यासाठी एखाद्या व्यक्तीचे नामनिर्देशन केले असल्यास, बँक अशा नामनिर्देशित व्यक्तीस, लॉकरधारकाच्या मृत्यू पश्चात सदर लॉकर हाताळण्याची परवानगी देऊ शकते. प्रसंगी, नामनिर्देशित व्यक्ती त्यामधील ऐवज देखील काढून घेऊ शकते. तथापि, सदर कार्यवाही करत असताना संबंधित नामनिर्देशित व्यक्तीच्या सहीचा Annex I-A या विहित नमुन्यातील Claim form, लॉकरधारकाचा मृत्यूचा दाखला, नामनिर्देशित व्यक्तीचे ओळख व पत्त्याची खात्री करणारे O.V.D. (Official Valid Documents) इत्यादी कागदपत्रांची पूर्तता करून प्रकरणाचा निपटारा करावा.
- संयुक्त पद्धतीने (Joint) घेतलेल्या लॉकरकामी लॉकर धारकांनी नामनिर्देशन केले असेल व सदर लॉकर संयुक्त खातेदारांच्या सहीने हाताळण्याबाबत / वापराबाबत बँकेस सूचना असतील अशा प्रकरणी संयुक्त लॉकर धारकांच्या पैकी कोणी मयत झाल्यास, सदर लॉकर हाताळण्यासाठी / वापरासाठी हयात लॉकर धारक व मयत लॉकर धारकाचे वारसास अधिकार राहील व अशा प्रसंगी नमूद व्यक्ती सदर लॉकर मधील ऐवज काढून देखील घेऊ शकतात. तथापि, सदर कार्यवाही करत असताना संबंधित नामनिर्देशित व्यक्तीच्या सहीचा Annex I-A या विहित नमुन्यातील Claim form, लॉकरधारकाचा मृत्यूचा दाखला, नामनिर्देशित व्यक्तीचे ओळख व पत्त्याची खात्री करणारे O.V.D. (Official Valid Documents) इत्यादी कागदपत्रांची पूर्तता करून प्रकरणाचा निपटारा करावा.
- Survivorship स्वरूपाच्या लॉकर खात्यांबाबत, लॉकर धारकांनी सदर लॉकर हाताळण्याचे / वापरण्याचे अधिकार Either or Survivor किंवा Former or Survivor किंवा Later or Survivor किंवा Anyone or Survivor यापैकी कोणालाही दिले असल्यास, अशा प्रसंगी सहलॉकर धारक यांचे सहीचा विहित नमुन्यातील Annex I-A प्रमाणेचा Claim Form आवश्यक माहितीसह सविस्तर भरून घ्यावा. ( सदर क्लेम फॉर्म मधील गैरलागू मजकूर खोडवा), हयात सहलॉकरधारक याचे कोणतेही एक Officially Valid Document (OVD) घ्यावे. ज्यामध्ये पासपोर्ट, ड्रायव्हिंग लायसेन्स, निवडणूक आयोगाने जारी केलेले मतदान ओळखपत्र, NREGA यांनी जारी केलेले जॉब कार्ड ज्यावरती राज्य शासनाच्या अधिकाऱ्याची सही असेल, Unique Identification Authority of India यांनी जारी केलेले आधार कार्ड ई. चा समावेश असेल.
- **एखाद्या लॉकर खात्यास नामनिर्देशन केलेली व्यक्ती अज्ञान असल्यास व अशा प्रसंगी लॉकर मधील ऐवज काढण्याची वेळ असल्यास, असे ऐवज हे नमूद अज्ञान नामनिर्देशित व्यक्तीच्या वतीने त्याचे पालक ज्यांचा सविस्तर तपशील नामनिर्देशनाच्या अर्जावर दिला असेल, अशा व्यक्तीच्या ताब्यात द्याव्यात. ज्या ठिकाणी नामनिर्देशनाच्या अर्जावर अज्ञान नामनिर्देशितच्या पालकांचे संदर्भात कोणताही उल्लेख केलेला नसेल, त्या ठिकाणी लागू कायद्यातील तरतुदीनुसार, नमूद अज्ञान नामनिर्देशितच्या वतीने सदर ऐवज स्विकारण्यासाठी पात्र असणाऱ्या व्यक्ती प्रामुख्याने आई आणि त्यानंतर वडील यांच्या ताब्यात सदर ऐवज द्यावेत.**
- **लॉकर धारकाच्या मृत्यूपश्चात नामनिर्देशित व्यक्तीस अगर Survivorship स्वरूपाच्या लॉकर खात्याच्या बाबतीत सह लॉकर धारकास लॉकर हाताळण्यासाठी / वापरासाठी देण्यापूर्वी घ्यावयाची काळजी–**

अ. मयत लॉकर धारक, नामनिर्देशित व्यक्ती, तसेच हयात सह लॉकर धारकाची ओळख पटविताना योग्य काळजी व सावधगिरी बाळगावी व संबंधितांचे कडून त्या अनुषंगिक कागदोपत्री पुरावा बँक दप्तरी घ्यावा.

आ. नामनिर्देशित व्यक्तीस तथा हयात सह लॉकर धारकास मयताचे लॉकर हाताळण्या / वापरण्या अथवा लॉकर मधील जिन्नस काढून नेणेबाबत कोणत्याही सक्षम न्यायालयाचा मनाई आदेश नसल्याची खात्री करावी.

इ. या प्रकरणी नामनिर्देशित व्यक्ती अथवा सह लॉकर धारकास बँकेतर्फे असे लेखी सूचित करणे गरजेचे आहे की,लॉकर हाताळण्या / वापरण्या संबंधी अथवा लॉकर मधील जिन्नस काढून नेणेबाबत नामनिर्देशित व्यक्तीस तथा हयात सह लॉकर धारकास दिलेले अधिकार हे मयताच्या वारसांचे विश्वस्त या नात्याने दिलेले असून, त्यामुळे नामनिर्देशित व्यक्तीच्या विरुद्ध तसेच Survivorship स्वरूपाच्या खात्यांच्या बाबतीत हयात सहखातेदाराच्या विरुद्ध कोणत्याही व्यक्तीचा संबंधीत लॉकर खात्याबाबतचा हक्क अथवा अधिकार संपुष्टात येणार नाही.

- वर नमूद प्रमाणे कागदोपत्री पूर्तता झाले नंतर व सादर वारस प्रकरणामध्ये सत्यता असल्याची खात्री झाले नंतर,लॉकर मधील जिन्नस / मुद्देमाल काढण्याची कार्यवाही करण्यापूर्वी, संबंधित नामनिर्देशित व्यक्ती व Survivorship स्वरूपाच्या लॉकर खात्यांच्या बाबतीत हयात सह लॉकर धारकास बँकेद्वारे लेखी पत्राने लॉकर मधील जिन्नस / मुद्देमाल काढण्याच्या अनुषंगाने नेमलेली तारीख व वेळ कळविण्यात येईल. नेमले वेळेस Annex I-F मधील विहित नमुन्यामध्ये लॉकर मधील जिन्नस / मुद्देमाल याची यादी करण्याची प्रक्रिया, नामनिर्देशित व्यक्ती तथा हयात सह लॉकर धारक किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी, दोन साक्षीदार ( सदर साक्षीदार हे बँकेचे आजी किंवा माजी कर्मचारी असता कामा नये), बँकेच्या वतीने बँकेचे लॉकर कस्टोडीयन, बँकेचा एक कर्मचारी (लॉकर हाताळण्याच्या प्रक्रीये मध्ये सहभाग नसलेला) यांचे उपस्थितीमध्ये राबविली जाईल व त्यानंतर लॉकर मधील जिन्नस / मुद्देमाल हा संबंधित नामनिर्देशित व्यक्ती/ हयात सह लॉकर धारक किंवा अज्ञानाचे वतीने सदर मुद्देमाल स्विकारण्यासाठी पात्र व्यक्ती यांचे ताब्यात देवून, त्याबाबतची पोहोच Annex I-F मधील विहित नमुन्यामध्ये घेवून, सदर रिकामा लॉकर बँक नियमानुसार इतर व्यक्तीस देण्यात येईल.
- नामनिर्देशना मध्ये तफावत आढळून आली तरच नामनिर्देशित व्यक्ती तथा हयात सह लॉकर धारकाकडून कायदेशीर कागदपत्रांचे म्हणजेच वारसा दाखला, प्रोबेट, हमीपत्र, Letter of Administration या कागदपत्रांची मागणी करावी.
- मयताने बँकेच्या सुरक्षित ताब्यात ठेवलेल्या वस्तूंच्या परताव्या बाबत वर नमूद प्रमाणे कार्यपद्धतीचा वापर करावा व त्याकामी करावयाची यादी ही Annex I-G या विहित नमुन्या प्रमाणे करावी.

### १४.२ लॉकर खात्यास नामनिर्देशन (Nomination) नसल्यास / Survivorship स्वरूपाचे नसल्यास –

नामनिर्देशित तथा हयात सह लॉकरधारकाना लॉकर मधील जिन्नस / मुद्देमाल मिळणेमध्ये गैरसोय होऊ नये यासाठी बँकांनी अशा प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी सोप्या कार्यपद्धतीचा वापर करणे गरजेचे आहे. अर्थात अशी कार्यपद्धती स्वीकारत असताना खालील गोष्टींची खात्री करावी–

अ) वारस / सह लॉकरधारक यांचे मध्ये कोणतेही वाद नाहीत

आ) मयत लॉकरधारकाने लॉकर खात्यास नामनिर्देशन केलेले नाही किंवा

इ) Survivorship स्वरूपाचे लॉकरखाते, संबंधित सर्व लॉकरधारक किंवा त्यांचेपैकी कोणीही वापरण्या संबंधी बँकेस सूचना दिलेल्या नाहीत किंवा

ई) मयत लॉकर धारकाने कोणतेही मृत्यूपत्र केलेले नाही

